# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ३८९–२०१०–११/ दिनांक :

श्री. शंकर कुंडलीक कोळी ,
मु. पो. शेगांव, ता. जत, जि. सांगली — अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, जत, जि. सांगली — विरूध्द पक्षकार

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी.पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

शंकर कुंडलीक कोळी, मु.पो. शेगांव, ता. जत, जि. सांगली यांनी आपले प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ चे कलम ६.१० मधील तरतुदीनुसार वितरण कंपनीविरुध्द दि. २०.१.२०११ रोजी तक्रार दाखल केली त्याचा तपशील खालील प्रमाणे –

ग्राहकाने वितरण कंपनीकडे आपल्याला घरगुती वीज पुरवठा मिळावा यासाठी अर्ज करुन त्या प्रमाणे चलन रु. ५०७/– दि. १.१.२०१० ला पावती क्र. ८०२२७३९ नुसार भरले. चाचणी अहवाल दि. १०.१०.२०१० रोजी शाखा कार्यालय, शेगाव येथे दिला. अंतर्गत कक्षाकडे दि. १२.१०.२०१० ला अर्ज केला. वीज वाहिनी विस्तार करुन वीज जोडणी द्यावी अशी मागणी केली. अंतर्गत कक्षाने आदेश केले नाहीत. वि.प.ने वीज जोडणीसाठी लागणारे तीन डांब उभे केले मात्र पुढे या कामाची प्रगती न झालेने ग्राहकाने तक्रार दाखल केली आहे. मंचाकडून अपेक्षित मदत – विद्युत पुरवठा लवकर देण्याचे आदेश व्हावेत.

वितरण कंपनीला दि. ९.२.२०११ पर्यंत लेखी आदेश देण्यासाठी नोटीस दिली होती, परंतु आजातागायत मंचाकडे लेखी अहवाल प्राप्त झाला नाही. प्रस्तुतची केसची मंचासमोर सुनावणी दि. ८.३.२०११ ला निश्चित करण्यात आली असतां, ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांनी दि. ४.३.२०११ ला मंचाचे सदस्य सचिव यांच्याकडे ग्राहकाचा निशाणी अंगठा दस्तूर केलेला अर्ज दाखल केला. त्यामध्ये घरगुती वीज पुरवठा मिळाला आहे, नुकसान भरपाईची मागणी करणार नसलेने तक्रार मागे घेण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे. त्यावर ग्राहक प्रतिनिधींनी सही केली आहे, परंतु नजरचुकीने ७.३.२०११ तारीख लिहील्याचे दिसते. ग्राहक प्रतिनिधींनी ग्राहकाच्या तक्रार मागे घेण्याच्या अर्जावर आपली संमत्ती देवन सही केली आहे. अर्जावर ग्राहकाचा अंगठा दस्तूर केलेला आहे, ग्राहकास वीज जोडणी मिळाली आहे, भरपाईची मागणी सोडून दिली आहे, त्यामुळे तक्रार निकाली काढणे येत आहे. खालील प्रमाणे आदेश –

## आदेश

१) ग्राहकाचा मंचासमोर प्राप्त झालेला भरपाई नको व तक्रार मागे घेत असल्याचा अर्ज विचारांत घेवून तक्रार निकाली काढणेत येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ५.३.२०११ ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.